संजय पवार : रावेरची जागा भाजप नव्हे अजित पवार गट लढणार

पाटील, देवकरांनी मतदारसंघ राखावे !

जळगाव, (वा.) राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे डॉ.सतीश पाटील,गुलाबराव देवकर यांचे मतदारसंघ त्यांच्या पक्षाकडे राहणार नाहीत. त्यामुळे त्यांनी आमचे नेते अनिल पाटील यांच्यावर टीका करण्याअगोदर आपले मतदारसंघ टिकवावेत, असा इशारा राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे जिल्हाध्यक्ष संजय पवार यांनी दिला आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे माजी मंत्री डॉ.सतीश पाटील यांनी अनिल पाटील हे भाजपत जाणार अशी टीका केली, त्यावरून जोरदार वाद सुरू झाला आहे. त्या बाबत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष संजय पवार यांनीही राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या नेत्यावर टीका केली आहे. आमचे नेते अनिल पाटील हे अजित पवार यांच्यसमवेत राहण्यास खंबीर आहेत. परंतु तुम्हाला आता तुमचे पाहण्याची गरज आहे. महविकास आघाडीत डॉ.सतीश पाटील यांचा एरंडोल पारोळा व गुलाबराव पाटील यांचा जळगाव ग्रामीण मतदारसंघ त्यांच्या पक्षाकडे राहणार नाही. शिवसेना ठाकरे गट या मतदार संघात लढणार आहे. ते तयारीही करीत आहेत. या दोन्ही मतदारसंघात शिवसेना निवडून आली आहे. त्यामुळे त्यांचा या मतदारसंघावर दावा आहे. त्या मुळे दोघांचे उमेदवारीचे भवितव्य पक्षात अधांतरी आहे. त्या मुळे विधानसभा निवडणुकीत त्यांच्याच पक्षात ठावठीकाणा राहणार नाही आणि ते आमच्या नेत्यावर टीका करीत आहे.त्यांनी आता हे बंद करावे.

डॉ.पाटील शरीराने पवारांकडे

डॉ.सतीश पाटील यांच्यावर टीका करताना संजय पवार यांनी म्हटले आहे.की,ते मनाने अजित पवार यांच्या कडे आहेत.केवळ शरीराने शरद पवार यांच्याकडे आहेत.केवळ तांत्रिक दृष्ट्या ते शरद पवार गटात आहेत. त्यांना तेथे काहीच मिळाले नाही.अनिल पाटील यांना मंत्रिपद मिळाले म्हणून त्यांना शल्य आहे.

जिल्ह्यातील दोन जागा लढविणार

महायुतीत आम्ही जिल्ह्यात दोन जागा लढणार असल्याचा दावा संजय पवार यांनी केला आहे.त्यात अमळनेर येथे आमचा आमदार असल्याने ही जागा आमचीच आहे.तर महायुतीत नियमा प्रमाणे महाविकास आघाडीत ज्या ठिकाणी काँग्रेस लढली त्या जागा राष्ट्रवादी अजित पवार गटाकडे आहेत.त्या मुळे रावेर भाजप नव्हे तर राष्ट्रवादी अजित पवार गट ही जागा लढणार आहे.आमच्या कडे या मतदार संघात सक्षम उमेदवार आहे.

भाजपतर्फे काँग्रेस भवनसमोर आंदोलन

हिंदू धर्माचा अपमान केल्याबद्दल गांधींचा निषेध

जळगाव, (वा.) संसदेतील काँग्रेसचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी हिंदु धर्माचा अपमान केल्याच्या निषेधार्थ भारतीय जनता पक्षाच्या शहर शाखेतर्फे त्यांच्या प्रतिमेला काँग्रेस भवनासमोर जोडे मारण्यात आले.

भारतीय जनता पक्षाच्या शहर शाखेतर्फे आंदोलन करण्यात आले. जी.एम. फाउंडेशन येथील भारतीय जनता पक्षाच्या कार्यालयापासून घोषणा देत रॅली काढण्यात आली. यावेळी राहुल गांधी यांच्या निषेधाच्या घोषणा देण्यात आल्या. राहुल गांधी हाय हाय, हिंदू धर्माचा अपमान करणाऱ्या राहुल गांधी यांचा निषेध असो अशा घोषणा देण्यात आल्या. शहरातील काँग्रेस भवन कार्यालयासमोर भाजपच्या कार्यकर्त्यांनी राहुल गांधी यांच्या प्रतिमेला जोडे मारले.

हे निषेध आंदोलन भाजपचे जिल्ह दूध संघाचे अरविंद देशमुख यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले. यावेळी महानगर महामंत्री डॉ.राध्येश्याम चौधरी, माजी महानगराध्यक्ष दीपक सूर्यवंशी, मुविकोराज कोल्हे, महीला आघाडीच्या माजी महापौर भारती सोनवणे, जितेंद्र मराठे, यांच्यासह सर्व फ्रंट आणि आघाड्याचे प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी होते.

सात दिवसांची कोठडी ● इस्पुर्लीच्या चोरट्याला पोलिसांनी केले गजाआड

चोरी भडगावला, दागिने विकले रायपुरला

भडगाव, (वा.) काही दिवसांपुर्वी शहरातील विद्यानगरातील प्रकाश भोसले यांच्या घरात घरफोडी झाली होती. तात्रिंक आधारावर या चोरीचा उलगडा पोलिसांनी केला असून कोल्हापूर जिल्ह्यातील इस्पुर्ली येथील चोरट्याच्या मुसक्या आवळल्या. तर छत्तीसगड राज्यातील रायपूर येथून मुद्देमाल हस्तगत केला. न्यायालयाने त्याला सात दिवसांची कोठडी ठोठावली आहे. भोसलेंकडे झालेल्या चोरीचा तपास पोलिस निरीक्षक पांडुरंग पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू होता. चोरट्याने तब्बल १० लाख ८६ हजार ४०० रुपयांचा ऐवज चोरी केला होता. तांत्रिक आधारावर या चोरीचा उलगडा पोलिसांनी केला. आरोपी प्रशांत काशिनाथ करोशी वय ३८ रा. २१, मौजे इस्पुर्ली ता. करवीर जि. कोल्हापूर याला ताब्यात घेतले. पोलिस तपासात आरोपीने दागदागिने छत्तीसगड राज्यातील रायपूर येथील सोनाराला विकल्याची कबुली दिली. पथकाने आरोपीस सोबत नेत संबंधित सोनाराला गाठून मुद्देमाल मिळवला. आरोपीला न्यायालया समक्ष हजर केले असता सात दिवसांची पोलिस कोठडी ठोठावली. त्याच्याकडून अजून काही गुन्ह्यांची उकल होण्याची शक्यता पोलिसांनी वर्तविली आहे.

पोलीस अधीक्षक महेश्वर रेड्डी, अपर अधीक्षक कविता नेरकर, डीवायएसपी अभयसिंग देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक पांडुरंग पवार, उपनिरीक्षक शेखर डोमाळे, हवालदार किरण पाटील, प्रवीण परदेशी, संदीप सोनवणे आदींच्या पथकाने ही कारवाई केली. तपास उपनिरीक्षक शेखर डोमाळे करीत आहेत.

अक्षयच्या कुटुंबियांना आर्थिक मदत द्या!

मंत्री पाटील यांची चौकशीची मागणी

अमळनेर, (वा.) मुंबईत बाळेगाव कॅम्प येथे पोलिस भरती दरम्यान अमळनेर येथील अक्षय बिऱ्हाडे हा तरूण मयत झाला. त्याच्या कुटुंबियांना मुख्यमंत्री सहायता निधीमधून मदत द्यावी आणि या घटनेची चौकशी व्हावी अशी मागणी मदत व पुनर्वसन मंत्री अनिल पाटील यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली आहे. पोलिस भरतीची मैदानी चाचणी सुरु असताना अक्षय चक्कर येऊन पडला. त्याला कळवा येथील छत्रपती शिवाजी हॉस्पीटलमध्ये दाखल केले असता उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. अक्षयच्या कुटुंबाची आर्थिक स्थिती बिकट असून एकलुता मुलगा गमावल्याने परिवाराचा आधार निखळला आहे. त्यामुळे बिऱ्हाडे कुटुंबियांना आर्थिक मदत मिळावी. तसेच अक्षयच्या उपचारादरम्यान डॉक्टरांकडुन हलगर्जीपणा झाला असल्यामुळेच मृत्यू झाला आहे.

कामात अडथळा, माजी नगरसेवकास अटक

चाळीसगाव, (वा.) शासकीय कामात अडथळा आणत मजुरांना मारहाण केल्या प्रकरणी भाजपच्या माजी नगरसेवकाविरूद्ध नवीन कायद्यानुसार गुन्हा दाखल होऊन अटक करण्यात आली आहे.

नगरपालिकेच्या विद्युत विभागाचे अभियंता कुणाल महाले यांच्या तक्रारीवरून फिर्याद दाखल केली आहे. त्यात नमूद आहे, की पालिकेतर्फे डीपी बसविण्याचे काम शहरातील धुळे रोडवर सुरु होते. यावेळी माजी नगरसेवक चिरागउद्दीन शेख हे मोठा जमाव घेऊन आले आणि जागेवरून वाद करू लागले. सरकारी कामात अडथळा आणून व पुरावा तयार होऊ नये म्हणून रेकॉर्डिंग करत असलेल्या मजूर साक्षीदारांना त्यांनी मारहाण केली. मोबाइल हिसकावत एकाचा मोबाई फोडून नुकसान केले.

जळगावात अतिक्रमण हटाव मोहीम तीव्र

जळगाव, (वा.) महापालिकेच्या अतिक्रमण निर्मूलन विभागातर्फे आज धडक कारवाई करण्यात आली.पांडे चौक व राजकमल चौकातील अतिक्रमण हटवीण्यात आले.

शहरातील रस्त्यावर अतिक्रमणात मोठया प्रमाणात वाढ झाली आहे. अनेक भागात रस्त्यावर गाड्या तसेच विक्रेते बसत असल्याने वाहतूकीस अडथळा होत आहे. महापालिकेकडे याबाबत नागरीकांच्या तक्रारी आलेल्या आहेत.त्यावर आता महापालिकेने कारवाई सुरू केली आहे.

शहरातील सिव्हील हॉस्पीटल जवळील पांडे चौकात मोठ्या प्रमाणात अतिक्रमण करण्यात आले आहे. या ठिकाणी रात्री अंडापावच्या गाड्या लावण्यात येत असतात. या ठिकाणी ग्राहक दारू पिवून खाली बाटल्या त्याच ठिकाणी असलेल्या शाळेच्या आवारात टाकत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्यानुसार अतिक्रमण निर्मूलन विभागात आज धडक कारवाई केली. याठिकाणी असलेल्या अंडा पाव विकणाऱ्या सर्व गाड्या जप्त केल्या आहेत. त्या महापालिकेत जमा करण्यात आल्या आहेत.

राजकमल चौकातील भंगार विक्रेत्यांनी थेट रस्त्यापर्यंत आपले विक्रीचे सामान आणले होते. त्यामुळे वाहतुकीस मोठ्या प्रमाणात अडथळा होत असल्याची नागरिकांची महापालिकेत तक्रार होती. त्यानुसार महापालिकेच्या अतिक्रमण विभागाने धडक कारवाई करीत या ठिकाणच्या भंगार विक्रेत्यांचे काटे तसेच ईतर सामान जप्त केले आहे.

खतांची होत असलेली लिंकीग रोखा!

प्रशासनाच्या हस्तक्षेपाची माजी आमदार कृषिभूषण पाटलांची मागणी

जळगाव, (वा.) रासायनिक खते निर्मिती कंपन्या व वितरक कृत्रिम टंचाई करत असून अनावश्यक खतांची सक्ती करत आहेत. त्यामुळे प्रशासनाने हस्तक्षेप करावा व तालुकानिहाय समान वाटप करावे, अशी मागणी माजी आमदार कृषिभूषण पाटील यांनी निवेदनाद्वारे जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे. खरीप हंगाम २०२४ या वर्षी जळगाव जिल्ह्यासह अमळनेर / पारोळा तालुक्यात शेतकरी बांधवांनी पिकांची खरीप पेरणी आटोपली आहे. कापूस, मका या मुख्य पिकांसह शेतकऱ्यांकडून रासायनिक खतांची मुख्य मागणी होत आहे. याबाबत कृषि केंद्र धारकांना विचारणा केली असता, ज्यावेळी इफको १०:२६:२६ व युरीया या खतांचा रैंक लागत असेल, त्यावेळी खत निर्मिती कंपन्यांकडून अनावश्यक विशिष्ट मालाची सक्ती केली जात आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना अनावश्यक खते कृषि केंद्रधारक आपल्या कृषी केंद्रांपर्यंत मागवत नाही, तोपर्यंत इफको १०:२६:२६ व युरीया यासारखी मागणी असलेल्या खतांची कृत्रिम टंचाई निर्माण होत आहे. इफको १०:२६:२६ व युरीयाचा कृत्रिम तुटवडा आहे. कृत्रिम टंचाईवर मात करण्यासाठी आपल्या स्तरावरून प्रत्येक रॅकचा तालुकानिहाय समान वाटप / हिस्सा ठरवून तो हिस्सा त्या तालुक्यासाठीच राखून ठेवून त्याचेवाटप खत निर्मिती कंपनीकडूनच करण्यात यावे. यात वितरकांचा हस्तक्षेप असू नये. त्यासाठी आपल्या स्तरावरूनच रासायनिक खते निर्मिती कंपन्यांनी प्रत्येक रॅकमधून सर्व तालुक्यांना आवश्यक मागणीनुसार कंपन्यांनी माल पाठविले जाणे बंधनकारक करण्याची कार्यवाही करावी असे नमूद केले आहे.

दुधाला स्थिर भाव द्या!

चाळीसगाव, (वा.) दुग्ध विकास मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या दालनात झालेल्या बैठकीत जिल्हा सहकारी दूध संघांचे चेअरमन आमदार मंगेश चव्हाण यांनी जिल्ह्यातील दूध उत्पादकांच्या विविध मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधले. दुधाला स्थीर भाव मिळावा, पाच रूपये लिटर अनुदानाचा निर्णय लागू करावा आणि दूध भुकटीला तीन रूपये अनुदान द्यावे अशा मागण्या त्यांनी मांडल्या. बैठकीला हरिभाऊ बागडे, सदाभाऊ खोत, आमदार विनय कोरे, शिवाजीराव कर्डिले यांच्यासह पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागाचे आयुक्त, वरीष्ठ अधिकारी, राज्यातील विविध दूध संघाचे प्रतिनिधी उपस्थित होते. गेल्या वर्षभरापासून दूध खरेदी दरात मोठ्या प्रमाणात घट झाल्याने उत्पादकांना आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे. त्यातच काही खासगी व सहकारी दूध संघ भावात कपात करत आहेत.

जाहीर सावध नोटिस

तमाम लोकांस या जाहीर सावध नोटिसने कळविण्यात येते की, मौजे वंजारवाडी तालुका बारामती जिल्हा पुणे येथील गट नंबर ५२ यासी क्षेत्र ०० हे. ५२ आर. पो.ख.०० हे. ०२ आर एकुण ००. हे.०.५४ आर. यासी आकार ००.६६ ही मिळकत विश्रांती गणपत साळुंखे यांच्या मालकी तावे वहिवाटीची असून त्याबाबत बारामती येथील न्यायालयामध्ये वाद सुरु आहे. आमच्या अशिलांचे नावाची नोंद ७/१२ सदरी होणेबाबत विषय न्यायप्रलंबीत आहे. सदर मिळकतीबाबत आमचे अशील यांच्या असे लक्षात आले की, या नोटीस मिळकतीचे रेकॉर्ड सदरी असणारे नोंदीचा गैरफायदा घेऊन काही इसम सदर मिळकत ति- हाईतांना विकण्याच्या प्रयत्न करीत आहेत. सबब या जाहीर सावध नोटीसीने तमाम लोकांस विशेषतः मौजे वंजारवाडी व बारामतीमधील व परिसरामधील लोकांना असे सावध करण्यात येते की, सदर नोटिशीमध्ये नमूद मिळकत ही आमच्या आशिल विश्रांती गणपत साळुंखे यांच्या मालकी वहीवाटीची व प्रत्यक्ष ताब्यातील आहे. सदर मिळकत संदर्भात कोणीही कसलाही व्यवहार (विक्री, हस्तांतरण दस्त व करार मदार, इ.) करु नयेत. तसे कोणी केल्यास तो आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही व तसेच सदर जाहीर नोटिशीनंतरही कोणी व्यवहार केल्यास त्याबाबतीत आमचे अशिल योग्य ती दिवाणी व फौजदारी कार्यवाही करतील व त्यानंतर होणाऱ्या नुकसानाची जबाबदारी तुमच्यावर राहील याची सत्य नोंद घ्यावी.

अॅडव्होकेट
श्री. इम्रान चाँद खान
रा. चोपडज पोस्ट वाकी ता.बारामती
जिल्हा पुणे मो.नं. ९८६००३६४७५

जाहिर नोटीस

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की आमचे अशिल **सौ. सुनीता सुहास चव्हाण आणि श्री. सुहास बिभिशन चव्हाण** हे रो-हाऊस क्रमांक ५२ बी/८ १३०.११ चौरस मीटरचे विक्रीयोग्य क्षेत्र. गाव-चिखली, ता-हवेली, जिल्हा-पुणे १८ येथे स्थित, सेक्टर क्रमांक १६ मधील प्लॉट क्रमांक ५२ वर बांधलेल्या सुजित विहार या नावाने ओळखल्या जाणाऱ्या योजनेत सध्याच्या मालमत्तेचे मालक आहेत.

अपार्टमेंट डीड क्रमांक १२३९/२०११/हवेली-१८ ची मूळ नोंदणीकृत अपार्टमेंट दस्त क्र. दि. ०४/०२/२०११ सोबत त्याची नोंदणी पावती आणि इंडेक्स-२ सध्याच्या मालमत्ता मालकाने गमावली आहे, जर कोणाला वर नमूद केलेले हरवलेले दस्तऐवज सापडले किंवा काही आक्षेप/दावे असतील तर माझ्या कार्यालयात कागदोपत्री पुराव्यासह या तारखेपासून ०७ दिवसांच्या आत लेखी तक्रारीसह अर्ज करणे आवश्यक आहे.

दिनांक : ०२/०७/२०२४
ठिकाण : पुणे

अॅड.संतोष आवरे
तावरे पाटील बिल्डिंग, ४५, पर्वतीगाव, पुणे - ४११००९
मो.नं.९८६०८०४५०४ ईमेल : advocateaware@gmail.com

जाहिर नोटीस

इस्लामपूर येथील मे. उपविभागीय अधिकारी, वाळवा भाग इस्लामपूर यांचे कोर्टात
टेनन्सी विलंब माफ अर्ज नं. २७१/२०२३

रेस्पॉंडेंट नं. १. शरद विनायक ठोंबरे, २. ताई विनायक ठोंबरे, ३. रुक्मिणी आबासो इनामदार (मयत वारस) ३अ. दिनकर आबासो इनामदार, ३ब. सदाशिव आबासो इनामदार, ४. कृष्णाबाई शामराव इनामदार (मयत वारस) ४अ. जयंत शामराव इनामदार, ४ब. नागेश शामराव इनामदार अ.नं. १ व २ धनश्री को. ऑप. हौ. सोसा, स.नं. १७, प्लॉट नं. ४, पुणे ५२, अ.नं. ३अ ते ४ब रा. नेलें ता. वाळवा जि. सांगली यांना या जाहिर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, मौजे चिकुर्डे ता. वाळवा येथील गट नं. ९१७/१ बाबत अपर तहसिलदार तथा शेतजमिन न्यायाधिकरण वाळवा इस्लामपूर यांनी क्र. टेनन्सी/ ३२ ग/ एस आर/०२/२०२० अन्वये दिनांक ३०/०५/२०२३ रोजी अपेलंट यांचा अर्ज अमान्य केलेला असून या निर्णयाविरुध्द अपेलंट यांनी विलंबमाफी अर्जासह अपील दाखल केलेले असून सदर अपीलाचे सुनावणीकामी तुमचे पत्यावर वारंवार नोटीस पाठवुनही बजावणी होत नसलेने तुमचे विरुध्द मे. कोर्टाने जाहिर नोटीसीचा आदेश केलेला आहे.

प्रस्तुत विलंब माफ अर्जामध्ये सुनावणी दिनांक १५/०७/२०२४ रोजी दुपारी ०३:०० वा. ''उपविभागीय अधिकारी वाळवा विभाग इस्लामपूर यांचे कार्यालय, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, पेठ- सांगली रोड इस्लामपूर'' यांचे दालनात नेमण्यात आली आहे.

सबब तुम्ही किंवा तुमच्या कायदेशीर प्रतिनिधींनी तुमचा कोणताही पुरावा असल्यास त्यासह सदरहू तारखेस ठिकाणी व वेळी माझेसमोर उपस्थित रहावे. वर निर्दिष्ठ केलेल्या वेळी व ठिकाणी उपस्थित राहण्यास कसूर केल्यास तुमच्या किंवा कायदेशीर प्रतिनीधीच्या अनुपस्थितीत अपीलाची एकतर्फा सुनावणी होऊन योग्य तो निर्णय दिला जाईल याची नोंद घ्यावी.

सदरील जाहिर नोटीस माझे सही व शिक्यानिशी आज दिनांक २०/०६/२०२४ रोजी दिली असे.
उपविभागीय अधिकारी,
वाळवा विभाग इस्लामपूर
टेनन्सी विलंब माफ अर्ज नं. २७१/२०२३

शिक्का

सही/-
(श्रीनिवास अर्जुन)
उपविभागीय अधिकारी,
वाळवा विभाग इस्लामपूर

अॅड. एस. एस. निकम

जुन्नर येथील मे. नम्रता एम. बिरादर दिवाणी न्यायाधीश सो. यांचे कोर्टात

जाहिर नोटीस

दिवाणी किरकोळ अर्ज क. ३३/२०२४
निशाणी क्र. ६

१. रफिक इसहाकखान मोकाशी इतर २ ..... अर्जदार
रा. सिपाई मोहल्ला ता. जुन्नर जि. पुणे.
विरुध्द
कोणी नाही ..... जाब देणार

ज्यापेक्षा कै. कुदसिया इसहाकखान मोकाशी **हया ०९/०७/२०१४ डॉ. मोकाशी हॉस्पिटल मंगळवार पेठ, जुन्नर ता. जुन्नर जि. पुणे येथे मयत झाल्या. तर अर्जदार १ ते ३ हे त्यांचे कायदेशिर वारस आहेत.** अर्जदार **रफिक इसहाकखान मोकाशी** यांनी या न्यायालयात सदरहु अर्जदार हे त्यांचे कायदेशीर वारस असले बद्दल सदरहू अर्जदार मयताचे इंडियन **सक्सेशन अॅक्ट कलम ३७२ प्रमाणे वारसा** हक्काचा दाखला (सक्सेशन सर्टीफिकेट) मिळणेकामी अर्ज केलेला आहे. जर कोणास सदर अर्जास हरकत घ्यावयाची असेल तर हया जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती न दाखविल्या तर सदरहू न्यायालय अर्जदार याचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू मयत वारसाचे प्रमाणपत्र (सक्सेशन सर्टीफिकेट) देण्यात येईल.

पुढील नेमलेली तारीख ०५/०८/२०२४
आज दिनांक २९/०५/२०२४ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले असे.

हूकूमावरून
सही/-
सहायक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क स्तर, जुन्नर

शिक्का

जाहीर प्रसिध्दकरण

उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी बारामती यांचे कार्यालय

जा.क्र. फौज/कावि/११८०/२०२४
दिनांक- ०२/०७/२०२४

१) सौ. चंपा त्रिमुर्ती साळवे] अर्जदार
रा. इंदापूर रोड, भोईटे हॉस्पिटलसमोर
प्रबुध्दनगर बारामती ता. बारामती जि. पुणे
विरुध्द
१) नगरपरिषद बारामती
नगरपरिषद बारामती ता. बारामती जि. पुणे } सामनेवाला

विषयः- जन्म-मृत्यु नोंदणी (दुरुस्ती) अधिनियम २०२३ कलम १३(२) (३) प्रमाणे अर्ज

ज्याअर्थी, यातील अर्जदार सौ. चंपा त्रिमुर्ती साळवे हे वर नमूद पत्त्यावरील कायमचा रहिवासी आहे. अर्जदार यांचा मुलगा सिध्देश त्रिमुर्ती साळवे यांचा जन्म दिनांक २९/१२/२०२० रोजी गाव- बारामती ता. बारामती जि. पुणे येथील राहत्या घरी/ दवाखान्यात झालेला आहे. अर्जदार यांची कार्यालयात जन्म रजिस्टरला नोंद नसल्यामुळे त्यांनी जन्म-मृत्यु नोंदणी (दुरुस्ती) अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) प्रमाणे नोंद होऊन जन्म दाखला दाखला मिळण्याकामी विनंती केली आहे.

त्याअर्थी सदर अर्जाकामी अर्जदार यांना जन्म दाखला मिळणेकामी कोणाची काही हरकत अथवा म्हणने असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाच्या आत किंवा उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी, बारामती या कार्यालयात नेमलेली तारीख - ०५/०८/२०२४ रोजीपर्यंत स्वतः अथवा आपल्या वकीलामार्फत हजर राहून आपले म्हणने मांडावे. कोणाचीही काही हरकत अथवा म्हणने मुदतीत न आल्यास कोणाचीही हरकत नाही असे समजुन या अर्जाची चौकशी होऊन अर्जदारास संबंधीत दाखला घेण्यात येईल.

सदरचे जाहिर प्रसिध्दीकरण आज दिनांक ०२/०७/२०२४ रोजी आमचे सही शिक्याने प्रसिध्द केले असे
ठिकाणः - बारामती
दिनांकः- ०२/०७/२०२४

शिक्का

सही/-
उपविभागीय अधिकारी
तथा उपविभागीय दंडाधिकारी बारामती

जाहीर सावध नोटिस

तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमीन मिळकत ही श्री. हंबीरराव बबनसो जगताप, रा-म्हातोबानगर, मुरुम, ता-बारामती, जि-पुणे यांच्या मालकी ताबे वहिवाटीची असून त्यांनी सदर मिळकत आमच्या अशिलास विकत देण्याचे कबुल करुन तशी मे पब्लीक नोटरी सो., बारामती यांचेसमोर विसारपावती लिहुन व नोंदवून देवून विसाराखल रक्कम स्विकारलेली आहे व तसा व्यवहार ठरलेला आहे. सदर मिळकत निर्वेध व निजोखमी असून ती केवळ उपरोक्त मालकास विकत देण्याचा हक्क व अधिकार असल्याचा भरवसा त्यांनी आमच्या अशिलास दिला आहे. तरी सदरील मिळकतीमध्ये इतर कोणाचा, कसल्याही प्रकारे मालकी हक्क, तोंडी अथवा लेखी विसारपावती, करार, साठेखत, दावा, पोटगी अगर हितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ८ (आठ) दिवसांच्या आत आम्हास लेखी कळवावे व कागदपत्रांनिशी खात्री पटवावी, अन्यथा सदरील मिळकत निर्वेध व निजोखमी असून इतर कोणाचा, काहीही हक्क, हितसंबंध नाही व असल्यास तो त्यांनी सोडून दिला आहे, असे समजले जाईल व नंतर कोणाची, कसलीही तक्रार चालणार नाही.

परिशिष्ट :- तुकडी पुणे, पोट तुकडी व तालुका बारामती, मे, दुय्यम निबंधक सो., बारामती यांचे हद्दीतील गाव मौजे मुरुम येथील शेतजमीन गट नं. ३२७ यांसी क्षेत्र ०० हे ६१ आर, आकार ०२ रु. - ०३ पै यांसी चतु:सिमा मुळ सरकारी रेकॉर्डप्रमाणे असत यापैकी विद्यमान मालक यांचे मालकी हक्क व ताबे वहिवाटीचे क्षेत्रापैकी ०० हे.- २० आर बागायत क्षेत्र यांसी चतु:सिमा पुर्व- गट नं. ३२७ पैकी लिहुन देणार व इतर -४ यांचे क्षेत्र, दक्षिण- धनंजय जगताप यांचे क्षेत्र, पश्चिम - गट नं. ३२७ पैकी लिहुन देणार यांचे शिल्लक क्षेत्र, उत्तर- दिपक गहिनीनाथ साखरे यांचे क्षेत्र हा या जाहीर नाटीसीचा विषय असे.

बारामती
दिनांक :- ०२/०७/२०२४

अशिलातर्फे अॅडव्होकेट
अॅड. नवनाथ एन. भोसले
ऑफिस- सोमेश्वरनगर, ता- बारामती, जि-पुणे.
मो.नं. ९९२११८००४३

वडगांव नगरपंचायत, ता. मावळ, जि. पुणे

जाहीर निविदा सुचना

जा.क्र. १४३५/२०२४ दि. ०२/०७/२०२४

वडगाव नगरपंचायत हद्दीमध्ये पावसाळी कामांसाठी मुरुम पुरविणेची निविदा मागविण्यात येत आहेत. तरी ज्या कोणाला इच्छा असेल त्यां ठेकेदाराने निविदा फॉर्म भरुन वडगाव नगरपंचायत कार्यालयात आवक विभागास मा. मुख्याधिकारी सो। यांचे नावे दि. ०३/०७/२०२४ ते दि.१०/०७/२०२४ अखेर सांयकाळी ५.०० वाजेपर्यंत नगरपंचायतीमध्ये पोहोच करावे. तसेच निविदा फॉर्म व फी याची माहिती नगरपंचायत कार्यालयात उपलब्ध आहे. कोणतेही निविदा अंशतः अथवा पुर्णपणे स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार वडगाव नगरपंचायतीने राखून ठेवलेला आहे.

डॉ. प्रविण निकम
मुख्याधिकारी तथा प्रशासक
वडगांव नगरपंचायत, ता. मावळ जि. पुणे

शिक्का

जाहीर प्रसिध्दकरण

उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी बारामती यांचे कार्यालय

जा.क्र. फौज/कावि/ १२८१/२०२४
दिनांक ०१/०७/२०२४

१) सौ. सोनाली श्रीकांत आबनावे
रा. वडगाव निं. ता. बारामती जि. पुणे } अर्जदार
विरुध्द
१) ग्रामसेवक / निबंधक वडगाव निं.,
ग्रामपंचायत वडगाव निं. ता. बारामती जि. पुणे } सामनेवाला

विषयः- जन्म-मृत्यु नोंदणी (दुरुस्ती) अधिनियम २०२३ कलम १३(२) (३) प्रमाणे अर्ज

ज्याअर्थी, यातील अर्जदार सौ. सोनाली श्रीकांत आबनावे वरील नमूत पत्तावर कायमच्या रहिवासी आहे. अर्जदार यांची मुलगी संभवी श्रीकांत आबनावे हिचा जन्म दिनांक- १७/११/२०१७ रोजी गाव- वडगाव निं.ता. बारामती जि. पुणे येथील राहत्या घरी / दवाखान्यात झालेला आहे. अर्जदार यांची कार्यालयात जन्म-मृत्यू रजिस्टरला नोंद नसल्यामुळे त्यांनी जन्म-मृत्यू नोंदणी (दुरुस्ती) अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) प्रमाणे नोंद होऊन जन्म दाखला मिळण्याकामी विनंती केली आहे.

त्याअर्थी सदर अर्जाकामी अर्जदार यांना जन्म / मृत्यु दाखला मिळणेकामी कोणाची काही हरकत अथवा म्हणने असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाच्या आत किंवा उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी, बारामती या कार्यालयात नेमलेली तारीख २९/०७/२०२४ रोजीपर्यंत स्वतः अथवा आपल्या वकीलामार्फत हजर राहून आपले म्हणने मांडावे. कोणाचीही काही हरकत अथवा म्हणने मुदतीत न आल्यास कोणाचीही हरकत नाही असे समजुन या अर्जाची चौकशी होऊन अर्जदारास संबंधीत दाखला घेण्यात येईल.

सदरचे जाहिर प्रसिध्दीकरण आज दिनांक ०१/०७/२०२४ रोजी आमचे सही शिक्याने प्रसिध्द केले असे
ठिकाणः- बारामती
दिनांक :- ०१/०७/२०२४

शिक्का

सही/-
उपविभागीय अधिकारी
तथा उपविभागीय दंडाधिकारी बारामती

जाहीर नोटीस

गाव मौजे नांदेड तालुका हवेली जि. पुणे येथील स.नं. १३/३अ, स.नं. १४, स.न.. १५/अ/१, अ/३/१, स.नं. १६/ब, ३+४अ / २, ३+४ब, स.नं. १७/४ नांदेड सिटी एनआरडी १६ या मिळकतीवर बांधलेल्या **नांदेड सिटी** या प्रोजेक्ट **मधील सरगम** मधील ए बिल्डींग मधील **अठ्ठाविसाव्या मजल्यावरील फ्लॅट** नं. २८०१ यांसी क्षेत्र **९२.१३ चौ.मी. + टेरेस क्षेत्र ५.८७ चौ.मी. + दोन कव्हर्ड कार पार्किंग** ही मिळकत खरेदी मालकी हक्काची व वहिवाटीची असून त्यांचेबरोबर सदर मिळकतीचे खरेदीबाबत आमचे अशिलांनी खरेदी करणेच्या उदेशाने विसार अदा केलेला आहे. तरी सदर मिळकतीवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा गहाण, लिज, लिन, साठेखत अथवा खरेदी, करारनामा, करार-मदार इत्यादी बोजा अथवा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध व अधिकार असल्यास सदर व्यक्ती अथवा इसमांनी प्रस्तुत नोटीस प्रसिद्ध झाले पासून ५ दिवसांचे आत अस्सल कागदपत्रांस आमची खात्री करून द्यावी. सदर मुदतीत हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध, निजोखमी व बोजारहित आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा पुढील व्यवहार पूर्ण करतील व सदर मुदतीनंतर आलेल्या हरकतीस आमचे अशिल जबाबदार राहणार नाहीत.

पुणे,
दिनांक : ०२/०७/२०२४

सही/-
अॅड. अजय खिलारी
बी / १५७, ओझोन व्हिला, वाघोली, ता. हवेली, जि. पुणे ४१२ २०७ मोबाईल नं. : ८८५४८८३५५५

बारामती नगरपरिषद, बारामती

महिला व बालकल्याण विभाग

जाहिर आवाहन

जा.क्र. बानप/कार्या- ७/मबावि/२६९/२०२४ दि. ०१/०७/२०२४

बारामती नगर परिषदेतर्फे बारामती शहरामधील महिला व युवतींसाठी **''प्रतिभा महिला प्रशिक्षण** योजनेअंतर्गत'' सन २०२३ -२४ या वर्षाकरिता एम.एस.सी. आय. टी, इंग्रजी संभाषणव, मराठी टायपिंग. शिवण काम. योगा व प्राणयाम, इंग्रजी टायपिंग, फोर व्हीलर ड्रायव्हींग प्रशिक्षण वर्ग सुरू करावयाचे आहेत. सदर प्रशिक्षण घेवू इच्छिणा-या लाभार्थीनी नगरपरिषदेकडील विहीत नमुन्यातील अर्ज करावा (अर्ज रू.२०/-) सदर प्रशिक्षणाचे अर्ज प्राप्त झाल्यानंतर प्रशिक्षणार्थीची मुलाखत घेण्यात येईल व त्यानंतर निवड झालेल्या लाभार्थ्यांना प्रशिक्षण शुल्काच्या १०% रक्कम भरावी लागेल. योगा व प्राणायाम प्रशिक्षण प्रशिक्षणकरिता मुलाखत व प्रशिक्षण शुल्काच्या १० % रक्कम घेतली जाणार नाही. प्रवेश अर्ज वाटप दि. ०३/०७/२०२४ ते दि. १२/०७/२०२४ पर्यंत राहील. तसेच प्रवेश अर्ज स्विकारण्याची अंतिम दि. १६/०७/२०२४ सायंकाळी ५:०० वाजेपर्यंत राहिल. प्रवेश अर्ज प्राप्त प्रशिक्षणार्थीची मुलाखत दि.२५/०७/२०२४ रोजी सकाळी १०.०० वाजता महिला व बालकल्याण विभागामध्ये सुरू होईल. अपूर्ण प्रवेश अर्जाचा विचार केला जाणार नाही. सदर कोर्सची माहिती खालीलप्रमाणे-

अ. क्र	विवरण पत्र अ मध्ये समाविष्ठ योजना	नगरपरिषेमार्फत राबविणेत येणा-या योजना	प्रशिक्षण कालावधी	पात्रता	प्रशिक्षणार्थीची संख्या
१	महिलांसाठी योगा व प्राणायामाचे प्रशिक्षण	योगा व प्राणायाम प्रशिक्षण देणे	२ महिने	-------	१००
२	कौशल्य विकास अंतर्गत मुलींना व महिलांना व बचत गटातील महिलांना व्यावसायिक प्रशिक्षण देणे	MS-CIT	३ महिने	९ वी पास	१५०
		मराठी टायपिंग	६ महिने	१२ वी पास	१५०
		इंग्रजी टायपिंग	६ महिने	१२ वी पास	१५०
		शिवणकाम	४ महिने	८ वी पास	७५
३	व्यक्तिमत्व विकास कार्यक्रम राबविणे	इंग्रजी संभाषण	२ महिने	१० वी पास	७५
४	बचत गटातील महिलांना व्यावसायिक प्रशिक्षण देणे (बचत गटातील महिला, विधवा, परितक्त्या यांना प्राधान्य)	चार चाकी गाडी चालक प्रशिक्षण	१ महिने	१० वी पास	२०

अर्जासोबत जोडावयांच्या कागदपत्रांची साक्षांकित प्रती :-
१.शैक्षणिक पात्रतेनुसार उत्तीर्ण असल्याचे गुणपत्रक. २. रेशन कार्ड किंवा रहिवासी दाखला. ३. ओळखपत्र (उदा. आधार कार्ड, मतदान ओळखपत्र, परवाना पत्र पैकी कोणतेही एक) ४. चार चाकी गाडी चालक प्रशिक्षण करीता वयोमर्यादा (१८ ते ४५) इतर साठी वयोमर्यादा १५ ते ४५ वर्ष असावी. ५ . नावात बदल असल्यास महाराष्ट्र शासन राजपत्र किंवा प्रतिज्ञापत्र जोडावे.

नियम व अटी :-
१ . प्रशिक्षण स्थळी जाण्याचा व येण्याचा खर्च प्रशिक्षणार्थीनी स्वतः करावयाचा आहे. २. एकदा निश्चित करण्यात आलेली प्रशिक्षण संस्था कोणत्याही कारणास्तव बदली करता येणार नाही. ३. शिवण काम प्रशिक्षण करिता आवश्यक असणारे साहित्य प्रशिक्षणार्थिनी स्वतः खरेदी करायचे आहे. ४. योगा प्रशिक्षण करिता स्थळ गुल पूनावाला गार्डन असणार आहे. ५. एका कुटुंबातील एकाच व्यक्तीला कोणत्याही एकाच प्रशिक्षणाचा लाभ घेता येईल. ६. बारामती नगरपरिषद घंटागाडीवर चालक म्हणून काम करणेकरिता घोषणापत्र. (चार चाकी गाडी चालक प्रशिक्षणाकरिता)

अधिक माहितीसाठी - महिला व बालकल्याण विभागाशी संपर्क साधावा.

सही/-
महेश रोकडे
मुख्याधिकारी गट-अ
बारामती नगरपरिषद, बारामती

महाराष्ट्र आयुर्वेद सेंटर प्रायव्हेट लिमिटेड (अवसायनात)
इ लिलाव विक्री सूचना

मेसर्स महाराष्ट्र आयुर्वेद सेंटर प्रायव्हेट लिमिटेड (अवसायनात) यांच्या मालकीच्या जमीन आणि इमारत यांची विक्री, इंसॉल्व्हंसी अँड बँकरप्सी बोर्ड ऑफ इंडिया (अवसायन प्रक्रिया) अधिनियम २०१६ च्या नियम ३२ आणि ३३ च्या अनुसार. विक्री प्रक्रिया ही निम्नस्वाक्षरीकार यांच्याकडून इ लिलाव व्यासपीठ : https ://right२vote.in/login यांच्या माध्यमातून आयबीबीआय (अवसायन प्रक्रिया) अधिनियम २०१६ चे परिशिष्ट १ च्या अनुसार खालील प्रमाणे नमूद करण्यात आलेल्या तपशिलाच्या अनुसार घेण्यात येणार आहे.

मालमत्ता	तपशील	राखीव किंमत (रु)	ईएमडी रक्कम (रु)
जमीन आणि इमारत	**फ्रीहोल्ड जमीन आणि फॅक्टरी इमारत पत्ता :** गट क्रमांक २६७ (भाग) आणि २६८ मौजे कोलवाडी, भोर, जिल्हा पुणे, महाराष्ट्र ४१२ २१३	३,१०,०६,२९३. ७५	३१,००,६२९. ३८

इ लिलावाची तारीख आणि वेळ : ०८ ऑगस्ट २०२४, वेळ दुपारी १२. ३० ते दुपारी २. ३० भारतीय प्रमाण वेळेच्या अनुसार
इ मेल आयडी : macpl.cirp@gmail.com ; मोबाईल क्रमांक : + ९१ ९९३०३३११४६
इ लिलाव सेवा पुरवठादार : राईट २ व्होट इन्फोटेक प्रायव्हेट लिमिटेड
इ लिलावाच्या अटी आणि शर्ती खालील प्रमाणे नमूद करण्यात आल्यानुसार आहेत

१ इ लिलाव **''जसे आहे जिथे आहे'' ''जे आहे ते आहे'' आणि ''जे आहे तसे आहे'' तत्वावर** मान्यताप्राप्त सेवा पुरवठादार मेसर्स राईट २ व्होट इन्फोटेक प्रायव्हेट लिमिटेड यांच्या माध्यमातून घेण्यात येणार आहे. ही इ लिलाव सूचना संपूर्ण इ लिलाव प्रक्रिया माहिती प्रपत्र ज्यात मालमत्तेच्या संपूर्ण माहितीचा समावेश आहे, इ लिलाव बोली प्रपत्र, डिक्लरेशन आणि इ लिलावाच्या सामान्य अटी आणि शर्ती यांचा समावेश आहे त्यासह वाचले जावे आणि ही प्रपत्रे मोबाईल क्रमांक + ९१ ९९३०३३११४६, इ मेल आयडी macpl.cirp@gmail.com सोमवार ते शुक्रवार येथे कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत आणि इ लिलाव सेवा पुरवठादार यांच्या संकेतस्थळावर उपलब्ध असतील.

२ मालमत्तेच्या संदर्भात संपूर्ण माहिती घेणे ही बोलीदार यांची जबाबदारी राहील आणि बोली सादर करण्याच्या पूर्वी संपूर्ण माहितीची खातरजमा बोलीदार यांनी करून घेणे आवश्यक आहे. लिलावासाठी ठेवण्यात आलेल्या मालमत्तांची पाहणी मालमत्तेच्या ठिकाणी करण्याची परवानगी संबंधित बोलीदारांना, हे सूचना प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून प्रपत्रे आणि ईएमडी सादर करण्याच्या शेवटच्या तारखेपर्यंत देण्यात येईल.

३ इच्छूक बोलीदार यांनी इ लिलावासात सहभाग घेण्यासाठी आपले विनंतीपत्र तसेच केवायसी प्रपत्रे आणि अन्य प्रपत्रे सादर करणे आवश्यक आहे. संबंधित प्रपत्रांचा आराखडा आणि नमुना इ लिलाव प्रक्रिया माहिती प्रपत्रातून घेता येईल. ही प्रपत्रे अवसायक यांच्या कार्यालयात प्रत्यक्ष स्वरूपात किंवा पोस्ट / कुरिअर यांच्या माध्यामातून वरील प्रमाणे नमूद करण्यात आलेल्या पत्त्यावर दिनांक **०१ ऑगस्ट २०२४** च्या पूर्वी प्राप्त होणे आवश्यक आहे. पात्र बोलीदार राखीव किमतीच्या **१०%** ईएमडी सादर केल्याचे पुरावे दिनांक **०१ ऑगस्ट २०२४** रोजी किंवा त्यापूर्वी सादर करू शकतात.

४ इच्छूक बोलीदार यांनी ईएमडी रक्कम ₹महाराष्ट्र आयुर्वेद सेंटर प्रायव्हेट लिमिटेड - अवसायनात यांच्या नावे काढलेल्या धनाकर्षच्या माध्यमातून भरणा करणे आवश्यक आहे.

५ बोलीदार यांना आवाहन करण्यात येते की त्यांनी आपल्या बोली सादर करण्याच्या पूर्वी आणि इ लिलाव विक्री प्रक्रियेत सहभाग घेण्याच्या पूर्वी इ लिलावाच्या सविस्तर अटी आणि शर्ती जाणून घेण्यासाठी https ://right२vote.in येथे भेट द्यावी.

दिनांक : ०३/०७/२०२४
स्थळ : पुणे

आयपी अशोक मित्तल
अवसायक
महाराष्ट्र आयुर्वेद सेंटर प्रायव्हेट लिमिटेड (अवसायनात)
नोंदणी क्रमांक : आयबीबीआय / आयपीए -००१/ आयपी - पी -०२५४९/२०२१-२०२२/ १३८८९
पत्ता : एस - १३८, बी विंग, एक्स्प्रेस झोन मॉल, पश्चिम द्रुतगती महामार्ग, गोरेगाव पूर्व, मुंबई उपनगर, महाराष्ट्र ४०० ०६३